# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक ०६/०९/२०२२ (मंगळवार)**

**(दुपार)**

---

### विनयभंग

पो.स्टे. कळमेश्वर:— दिनांक २५/०८/२०२२ चे १०.०० वा. दरम्यान अल्पवयीन फिर्यादी/पीडित वय १७ वर्ष ही घरी हजर असता आरोपी नामे— शिवा चौधरी, रा. डोरली हा तिचे घरी आला व म्हणाला की, 'तु माझ्या सोबत लग्न कर मी तुझ्यावर प्रेम करतो'' यावरून फिर्यादी हि घराचे बाहेर निघाली असता त्याने फिर्यादीचा पाठलाग करून 'तु माझ्या सोबत लग्न केले नाही तर मी तुझी बदनामी करीन, नाहीतर तुझ्या वडीलांना मारून टाकीन' अशी धमकी दिली. त्यामुळे फिर्यादीचे मनावर परीणाम होवुन फिर्यादीची प्रकृती खराब झाली. फिर्यादी तसेच फिर्यादीचे वडीलांची बदनामी होउ नये म्हणुन फिर्यादीने कोणालाही काही सांगीतले नाही. आरोपीचा त्रास वाढल्याने फिर्यादीने आई वडीलांना सर्व माहीती सांगीतली व त्यांचे सोबत रिपोर्ट देणेस आली करीता सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३५४ (ड), ५०६ भादंवी. सहकलम ८, १२ बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि गेडाम मो क्र. ९५०३९७३६५७ या करीत आहे.

### अकस्मात मृत्यू

१) पो.स्टे. अरोली :— अंतर्गत मौजा घोटमुंढरी भंडारा येथे दि. २८/०८/२०२२ चे १८.०० वा. सुमारास **दुर्योधन आनंद पटले (मृतक), वय ४५ वर्ष, रा. घोटमुंढरी** याने अज्ञात कारणातुन विषारी औषध प्राशन केले. त्यास उपचाराकरिता सरकारी दवाखाना भंडारा येथे भरती केले असता तो दि. २८/०८/२०२२ चे १८.०० वा. मरण पावला. पोस्टे अरोली येथे प्राप्त कागदपत्रावरून सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सर तर्फे पोउपनि जयप्रकाश ठाकुर पो.स्टे. अरोली यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. अरोली येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार टिकाराम जाधव मो.नं. ८८३०९६५३४७ हे करीत आहे.

२) पो.स्टे. रामटेक :— अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील मौजा चिचाळा नगरधन रोड पुल येथे **संजय नागोराव नागपुरे (मृतक), वय ३६ वर्ष रा. चिचाळा** हा दि ०४/०९/२०२२ रोजी ०४.०० वा. दुपारी शेतातुन परत येत असता सांड नदीला पुर आल्याने नदीवरील पुल ओलांडत असतांना अचानक नदीचेपाणी पुलावर वाढल्याने मृतक हा पाण्याचा प्रवाहात वाहुन गेला होता. त्याचा शोध घेतला असता दि ०५/०९/२०२२ रोजी दुपारी ०१.४५ वा. मृतक हा नदीच्या पाण्यात मृत अवस्थेत मिळुन आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— मोरेश्वर टिकाराम मोहाडे, वय ४० वर्ष रा. चिचाळा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोशि निर्बाते मो.नं. ८९९९२३३६४७ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. सावनेर :–** अंतर्गत १४ कि. मी. अंतरावरील चंद्रभागा नदी पाटणसावंगी दिनांक ०२/०९/२०२२ चे १५.३० वा. सुमारास **विजय अशोक भगत(मृतक) वय ३९ रा.वार्ड क्र. ४ वाकीपुरा पाटणसावंगी जि. नागपुर** हा दिनांक ०१/०९/२०२२ रोजी सकाळी ०९.०० वा. दरम्यान पाटणसावंगी ता. सावनेर हद्दीत इसलेले कोलार नदीवर आंघोळ करण्याकरीता गेला होता. त्याचा संतुलन बिघडल्याने व नदीचे पाण्याचा प्रवाह जास्त असल्याने नदीत वाहुन गेला असता मिळुन आला नाही. पो.स्टे. सावनेर येथे मिसींग क्र. ५९/२०२२ दाखल असुन घटना ता वेळी व ठिकाणी यातील नमुद मृतकाचे प्रेत हे नांदा शिवार येथे कोलार नदीचा बांधलेले लहान पुलाचा खाली मिळुन आल्याने व मृतकाची ओळख पटल्याने फिर्यादीच्या रिपोर्ट वरून व पो.स्टे. सावनेर येथुन मर्ग क्र. ००/२०२२ कलम १७४ जाफौ अन्वये चे कागदपत्र पो.स्टे. सावनेर ला प्राप्त झाल्याने मर्ग दाखल करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी सरतर्फे श्याम रामटेके पो.स्टे खापरखेडा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार बंडु कोकाटे ९८२२९४३६०५ हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

**१) पो.स्टे. पारशिवनी :–** अंतर्गत ४३ कि.मी अंतरावरील मौजा घाटपेंढरी शिवार येथे दिनांक ०४/०९/२०२२ चे २०:४५ वा. ते २१.३० वा. दरम्यान **दिपक लक्ष्मण सिंदराम(मृतक), वय २२ वर्ष, रा. वाघोली पो स्टे. देवलापार** याने अज्ञात कारणातुन भिमराम कोलोकर यांच्या रोडलगत असलेल्या शेतात आंब्याच्या झाडाच्या फांदीला काळया रंगाच्या दुपटयाने गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– कृष्णाकुमार जोहरसा अडमाचे(पोलिस पाटील), वय ५६ वर्ष, रा. घाटपेंढरी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. पारशिवनी येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोउपनी नागुलवार मो.क्र. ९९२३३७२६४७ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. जलालखेडा :–** अंतर्गत १५ कि.मी अंतरावरील मौजा लोहारा येथे दिनांक ०५/०९/२०२२ ते ०९.०० वा. ते ०९:३० वा. दरम्यान **ईश्वरदास नारायणदास बनगरे (मृतक), वय ५२ वर्ष रा लोहारा.ता.नरखेड** याचे नावावर ०६ ऐकर शेती असुन मृतक नावाने महिन्द्रा फायनन्सचे कर्ज सन २०१६ पासुन होते व सततची नापीकी झाल्यामुळे यातील मृतक हा नेहमी चिंतेत राहत होता. यातील घटना तारीख व वेळी ठिकाणी मृतक हा नापीकीला कंटाळुन व कर्जाला कंटाळुन शेतातील पळसाचे झाडाला दोरी बांधुन गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– विक्की ईश्वरदास बनगरे, वय २६ वर्ष, रा. लोहारा यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. जलालखेडा येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक प्रजोक तायडे मो.क्र. ८३०८९६४७१४ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**